follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

www.rajdand.com

। पश्चिम महाराष्ट्र ।

RNI Regd No.72105/99 * वर्ष २५ * अंक २८५ सातारा • शुक्रवार • दि. २७ जून २०२४ * पाने ८ * किंमत ५ रू/

## अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी विरोधक आक्रमक

**मुंबई :** पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी विरोधकांनी आक्रमक होत सरकारला अधिवेशन काळातील आपल्या इराद्यांची चुणूक दाखवून दिली. महायुती सरकार शेतकरी विरोधी असल्याचा आरोप करून विरोधकांनी विधान भवनाच्या पायऱ्यांवर ठाण मांडून जोरदार घोषणाबाजी केली.

विजय वडेट्टीवार आणि अंबादास दानवे या दोन्ही सभागृहाच्या विरोधी पक्ष नेत्यांच्या नेतृत्वाखाली विरोधकांनी सरकारला धारेवर धरले. शेतकरी विरोधी सरकारचा धिक्कार असो, शेतकऱ्यांची कर्जमाफी, वीज बिल माफी झालीच पाहिजे, कोरडा डोळा कोरडी विहीर, शेतकऱ्यांना कोण देणार धीर, अशा घोषणांचे फलक हाती घेऊन, टक्केवारी सरकार हाय हाय,, चोर सरकार हाय हाय अशा घोषणा देत विरोधकांनी निदर्शने केली.

सरकारने शेतकऱ्यांची फसवणूक केली असून त्यांना अद्याप अनुदान मिळालेले नाही, असा आरोप करताना दानवे यांनी शेतकऱ्यांची कर्ज माफ करावी, अशी मागणी ही केली.

अधिवेशन काळात सरकारला घेरण्याचा चंग विरोधकांनी बांधला आहे शेतकऱ्यांच्या समस्येबरोबरच पाणीटंचाई, पुण्यातील पोर्षेकार प्रकरण, अमली पदार्थ विक्री प्रकरण, मराठा आरक्षण आंदोलन, इतर मागासवर्गीयांचे आरक्षण बचाव आंदोलन, वाढती गुन्हेगारी अशा अनेक मुद्द्यांवर सरकारला धारेवर धरण्याचे विरोधकांचे धोरण आहे.

# संपूर्ण देशात धावणार बुलेट ट्रेन

## राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची माहिती



**दिल्ली :** बुलेट ट्रेन हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. मुंबई ते अहमदाबाद मार्गावरील बुलेट ट्रेनचेकाम वेगाने सुरू आहे. दरम्यानच्या काळात महाराष्ट्रातील समस्यांमुळे बुलेट ट्रेनचे काम संथगतीने सुरू होते. तर गुजरातमधील काम तुलनेने बऱ्यापैकी सुरू होते. आता दोन्ही राज्यांतील कामांना वेग आल्याचे सांगितले जात आहे. यातच आता संपूर्ण देशात बुलेट ट्रेन सुरू करण्याचा विचार केंद्र सरकार करत असल्याचे सांगितले जात आहे.

लोकसभा निवडणुकीनंतर

संसदेचे अधिवेशन सुरू असून, राष्ट्रपतीद्रौपदी मुर्मू यांनी संसदेला संबोधित केले. राष्ट्रपतींनी आपल्या अभिभाषणात अनेक मुद्द्यांवर भाष्य केले. त्यात बुलेट ट्रेन विस्ताराबाबतही माहिती दिली. संपूर्ण देशात आता बुलेट ट्रेनचा विस्तार करण्याची योजना केंद्र सरकारची आहे. त्यासाठी एक अभ्यास आणि निरीक्षण केले जाणार आहे.देशातील पायाभूत सुविधांच्या विकासावर भर देताना राष्ट्रपती मुर्मू यांनी सांगितले की, सरकारने देशाच्या उत्तर, दक्षिण आणि पूर्वेकडील बुलेट ट्रेन कॉरिडॉरसाठी अभ्यास सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. या अभ्यासात बुलेट ट्रेन धावण्यासाठी कोणते मार्ग असू शकतात हे पाहिले जाईल. त्यासाठी किती जमीन लागेल? ट्रॅक कसा बांधणार? या प्रकल्पावर सरकार किती खर्च अपेक्षित आहे? या सर्व गोष्टी तपासल्या जाणार आहेत. अहमदाबाद आणि मुंबई दरम्यान हाय-स्पीड रेल्वे इकोसिस्टमचे कामही वेगाने सुरू आहे. ५०८ किमी लांबीचा अहमदाबाद-मुंबई हाय-स्पीड कॉरिडॉर हा देशातील पहिला असा कॉरिडॉर आहे ज्यावर बुलेट ट्रेन ताशी ३२० किमी वेगाने धावेल. सुरत येथे मर्यादित थांब्यांसह संपूर्ण अंतर केवळ २ तास ७ मिनिटांत कापता येणे शक्य होणार आहे. नॅशनल हाय-स्पीड रेल कॉर्पोरेशनने सुरत आणि बिलीमोरा दरम्यानच्या पहिल्या टप्प्याचे काम ऑगस्ट २०२६ पर्यंत पूर्ण केले जाईल, असे सांगितले आहे.

## नापासांच्या शाळेतून भाजप घेणार धडे

**मुंबई :** लोकसभा निवडणुकीच्या परीक्षेत नापास झालेल्यांची शाळा भारतीय जनता पक्षाने भरवली असून त्यांच्या अपयशापासून आगामी विधानसभा निवडणुकीसाठी धडे घेण्याचा पक्षाचा प्रयत्न आहे.

नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्ष महायुतीला अपेक्षित कामगिरी करता आली नाही.. या पराभवाची कारणमीमांसा करण्यासाठी लोकसभेची निवडणूक हरलेल्या उमेदवारांची बैठक पक्षाच्यावतीने आयोजित करण्यात आली. या बैठकीला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह सर्वच पराभूत उमेदवार उपस्थित होते.

या निवडणुकीतील पराभवाचे नेमके कारण काय, नेमक्या कोणकोणत्या विधानसभा मतदारसंघातून पक्षाच्या उमेदवाराला कमी प्रतिसाद मिळाला, महायुतीतील घटक पक्षांपैकी कोणत्या पक्षाच्या नेते कार्यकर्त्यांनी उमेदवाराला साथ दिली आणि कोणत्या पक्षाच्या नेते कार्यकर्त्यांनी दिली नाही, पक्षातील कोणत्या नेत्यांनी उमेदवारासाठी निष्ठापूर्वक काम केले आणि कोणत्या नेत्यांनी ऐनवेळी हात वर केला, इतर पक्षाला सहाय्य केले, नाराजीला कारणीभूत ठरलेले स्थानिक मुद्दे कोणते, या सर्व बाबी पराभूत उमेदवारांनी पक्षाच्या बैठकीत मोकळेपणाने मांडल्या. या सर्वातून बोध घेऊन उर्वरित कालावधीत चुका दुरुस्त करून, मित्र पक्षांची स्थानिक पातळीवर संवाद प्रस्थापित करून येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत यश मिळवायचे आणि लोकसभा निवडणुकीतील अपयशाचे उट्टे काढायचे, असा निर्धार भाजपने केला आहे.

## फडणवीस यांच्या नावावर फुली : सुषमा अंधारे

**मुंबई :** उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नावावर आम्ही कधीच फुली मारली आहे. योगायोगाने त्यांची आणि शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट झाली असली तरी त्यामुळे पुन्हा एकत्र येण्याची सुतराम शक्यता नाही, अशी सडेतोड प्रतिक्रिया ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी व्यक्त केली आहे.

पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी उद्धव ठाकरे आणि देवेंद्र फडणवीस हे दोन नेते विधान भवनात एकमेकांच्या समोर आले आणि एकाच लिफ्ट मधून वरच्या मजल्यावर गेले. या भेटीचे तर्कवितर्क लढवून राजकीय विश्लेषण केल्याचा आव आणत शिवसेना आणि उद्धव ठाकरे गट पुन्हा एकत्र येण्याची शक्यता निर्माण झाल्याच्या वावड्याही उठवायला सुरुवात झाली. मात्र, अंधारे यांनी या वावड्यांचा चांगलाच समाचार घेतला आहे.

ठाकरे आणि फडणवीस हे योगायोगाने विधानभवनात एकत्र आले असतील. तिथे काही ५० लिफ्ट उपलब्ध नाहीत. त्यामुळे एकाच लिफ्टने वरच्या मजल्यावर गेले असतील. याचा अर्थ भाजप आणि शिवसेना पुन्हा एकत्र येणार असा होत नाही, असे अंधारे यांनी स्पष्ट केले.

एका ताटात घेऊन जेवले तरी...

फडणवीस यांच्या नावावर आम्ही कधीच फुली मारली आहे. फडणवीस आणि उद्धव ठाकरे लिफ्टमध्ये भेटलेच काय, अगदी एका ताटात जेवायला घेऊन बसले तरीही यापुढे भाजप आणि शिवसेना एकत्र येणे शक्य नाही. विषय संपला, असे अंधारे म्हणाल्या.

विषाचे घोट पाजणाऱ्यांनी दिले चॉकलेट

सरकारमधील ज्येष्ठ मंत्री चंद्रकांत पाटील यांनी विरोधी पक्ष नेत्यांना चॉकलेट दिले. त्यावरही अंधारे यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. भाजपने आम्हाला विश्वासघाताच्या विषाचे घोट पाजले आहेत. ते विष पचवूनही आम्ही पुन्हा समर्थपणे उभे राहिलो आहोत, असे अंधारे म्हणाल्या. विरोधी पक्ष नेत्यांना चॉकलेट दिले तरीही जनतेच्या प्रश्नावर आवाज उठवणे आम्ही बंद करणार नाही. जनतेला आश्वासनांचे चॉकलेट देऊ नका, असेही त्यांनी सत्ताधाऱ्यांना सुनावले.

## गल्लीतील कार्यकर्ते अजित पवारांवर बोलत असतील तर आम्ही शांत राहायचे का; अमोल मिटकरी संतापले



**मुंबई :** विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरू झाले आहे. पहिल्याच दिवशी विविध मुद्द्यांवरून विरोधी महाविकास आघाडीच्या नेत्यांनी सत्ताधारी महायुती सरकारवर जोरदार टीका केली.

तसेच विधिमंडळातील विविध नेत्यांच्या भेटी-गाठीही चर्चेच्या विषय ठरल्या. यासह महायुतीतील धुसपुसही समोर आली. भाजपा कार्यकर्त्याने अजित पवारांना महायुतीत घेतल्याबाबत उघडपणे नाराजी व्यक्त केली. यावरून राजकीय वर्तुळातून प्रतिक्रिया उमटत असून,राष्ट्रवादी कॉंग्रेसअजित पवार गटाचे नेतेअमोल मिटकरीयांनी संतप्त भाष्य केले आहे.-पुण्यातील शिरूरमध्ये एका बैठकीत भाजपाच्या एका कार्यकर्त्याने थेट उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर टीका केली.

तसेच त्यांना महायुतीमधून बाहेरचा रस्ता दाखवण्याची मागणी केली. यावरून आताअमोल मिटकरीयानी महायुतीतील भाजपा आणि शिवसेना शिंदे गटातील नेत्यांवर तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली.

भाजपाचा कोणीतरी एक गल्लीतील कार्यकर्ता अजित पवारांवर बोलला. मग आम्ही हे शांततेने ऐकायचे का?, महायुतीचा धर्म पाळण्याचा ठेका फक्त राष्ट्रवादीने घेतलाय का? अशी विचारणा अमोल मिटकरींनी केली.महायुतीमधील तिन्ही पक्षांनी समन्वय साधणे महत्त्वाचेमहायुतीमधील तीनही पक्षांनी समन्वय साधणे महत्त्वाचे आहे. आपल्या जिभेला आवर घातला पाहिजे. दुसऱ्यांची औकात काढण्यापेक्षा आपलीही औकात पाहिली पाहिजे, त्यानंतर बोलले पाहिजे. आमच्या पक्षाकडून आम्हाला नोटीस प्राप्त झाली, असे कळते आहे. अद्याप मला मिळाली नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या प्रवक्त्यांना आणि भाजपाने त्यांच्या प्रवक्त्यांना नोटीस दिली पाहिजे, या शब्दांत अमोल मिटकरींनी संताप व्यक्त केला.

# पुण्यात पालखी सोहळ्यासाठी ५ हजार पोलीस

**पुणे :** संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरू तुकाराम महाराज यांचे पालखी सोहळे रविवारी (दि. ३०) शहरात दाखल होणार आहेत. ३० जून आणि १ जुलै रोजी दोन्ही पालख्या मुक्कामी राहणार आहेत. या पालखी सोहळ्यासाठी वारकरी तसेच भाविकांची मोठी गर्दी होणार असून शहरात सुमारे ५ हजार पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. याशिवाय ठिकठिकाणी सीसीटीव्ही आणि वॉच टॉवरद्वारे लक्ष ठेवण्यात येणार आहे. याशिवाय गर्दीच्या ठिकाणी गुन्हे शाखेची खास पथके गस्त घालणार आहेत. श्रीक्षेत्र देहू येथून जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्याचे शुक्रवारी (दि. २८) प्रस्थान होणार आहे. तर, संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखी सोहळ्याचे



शनिवारी (दि. २९) प्रस्थान होणार आहे. रविवारी (दि. ३०) दोन्ही पालख्या पुण्यात दाखल होतील. पालखी सोहळा रविवारी आणि सोमवारी शहरात मुक्कामी असणार असून मंगळवारी (दि. २५) पालखी सोहळा पुढे मार्गस्थ होणार आहे. नाना पेठेतील श्री निवडुंग्या विठोबा मंदिर येथे श्री तुकाराम महाराज यांची पालखी मुक्कामी असणार आहे. भवानी पेठेतील विठोबा मंदिरात श्री ज्ञानेश्वर महाराज यांचा पालखी सोहळा मुक्कामी असणार आहे. पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली बंदोबस्ताची आखणी करण्यात आली असून सुमारे ५ हजार पोलिसांचा फौजफाटा शहरात बंदोबस्तासाठी तैनात राहणार आहे.

रविवारी (दि. ३०) पालखीसोबत लाखो भाविक शहरात मुक्कामी असणार असून मुक्कामाच्या ठिकाणी पोलिसांकडून मोठा बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. ठिकठिकाणी वॉच टॉवर, सीसीटीव्ही लावण्यात येणार आहेत. पालख्यांचे शहरात आगमन होण्यापासून पालख्या शहराबाहेर मार्गस्थ होईपर्यंत पोलिसांकडून चोख बंदोबस्ताचे नियोजन करण्यात आले आहे. वाहतुकीच्या नियोजनासाठी स्वतंत्र पोलिस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे.

### गुन्हे शाखेची खास पथके वारकऱ्यांच्या वेशात...

**पालखी सोहळ्यातील गर्दीचा गैरफायदा घेत चोरटे भाविकांकडील ऐवज चोरी करतात. सोनसाखळी चोरी, मोबाइल चोरी रोखण्यासाठी गुन्हे शाखेतील पोलिसांची पथके साध्या वेशात गस्त घालणार आहे. यावेळी काही कर्मचारी वारकऱ्यांच्या वेशात सहभागी होणार आहेत.**

**असा असेल बंदोबस्त...**

**अप्पर पोलिस आयुक्त - २**

**पोलिस उपायुक्त - १०**

**सहायक पोलिस आयुक्त - २०**

**पोलिस निरीक्षक- १०१**

**सहायक निरीक्षक, उपनिरीक्षक - ३४३**

**पोलिस कर्मचारी - ३ हजार ६९३**

**होमगार्ड - ८००**

**राज्य राखीव पोलिस दलाची एक तुकडी**

## पंकजा मुंडेंना विधान परिषदेत संधी मिळणार?

### भाजपाकडून चाचपणी सुरू

**मुंबई :** लोकसभा निवडणुकीत महायुतीला पराभवाचा जोरदार धक्का बसला. महाविकास आघाडीने मोठे कमबॅक करत बाजी मारली. यातच विधानसभेचे पावसाळी अधिवेशन सुरू आहे. विधान परिषदेचे ११ सदस्य पुढील महिन्यात निवृत्त होणार आहेत. त्यामुळे, विधान परिषद निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. विधान परिषदेवर आता सर्वच पक्षांकडून कोणाला संधी मिळते, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे. यातचपंकजा मुंडेयांना विधान परिषदेवर संधी मिळू शकते, अशी चर्चा आता राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

विधान परिषदेच्या शिक्षक, पदवीधर मतदारसंघांच्या ४ जागांसाठी नुकतीच निवडणूक पार पडली. तर, जुलैमध्ये आता विधान परिषदेच्या ११ जागांसाठी निवडणूक होत आहे. त्या पार्श्वभूमीवर आता भाजपकडून विधान परिषदेच्या ५ जागांसाठी ११ नावांची चर्चा सुरू झाल्याची माहिती देण्यात आली आहे. यामध्ये लोकसभा निवडणुकीत पराभूत झालेल्या नेत्यांना संधी मिळू शकते, असा मोठा कयास बांधला जात आहे.पंकजा मुंडेंनाविधान परिषदेत संधी मिळणार?काही चर्चांनुसार, लोकसभा निवडणूकीत पराभूत झालेल्या बीडमधील पराभूत उमेदवार पंकजा मुंडे, जालन्यातील पराभूत उमेदवार रावसाहेब दानवे आणि परभणीतील पराभूत उमेदवार महादेव जानकर यांच्या नावाची विधान परिषदेच्या जागांसाठी चर्चा सुरू असल्याचा दावा करण्यात येत आहे.

# देवेंद्र फडणवीस हा राज्यातील सर्वात कुरूप चेहरा : असीम सरोदे

**पुणे :** महाराष्ट्रात सर्वाधिक असंवैधानिक, बेकायदेशीर राजकारण उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले असून आजच्या घडीला तोच महाराष्ट्रातील सर्वात कुरूप चेहरा आहे, अशी टीका विधीज्ञ असीम सरोदे यांनी केली. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनाही त्यांनी धारेवर धरले.

महाराष्ट्रातील शिवसेना आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस हे दोन पक्ष देवेंद्र फडणवीस यांनी फोडले. एकीकडे नार्वेकर हा पक्ष फुटीचा प्रकार नसून पक्षांतर्गत वाजाचा प्रकार आहे. त्यामुळे तो पक्षांतर बंदी कायद्यांतर्गत येत नाही, असा दावा करीत आहेत. दुसरीकडे फडणवीस यांनी एका मुलाखतीत, मी गेलो, येईल येईन म्हणताना दोन पक्ष फोडून आलो, असे स्वतःच सांगितले आहे. हे फोडाफोडीचे राजकारण महाराष्ट्राला मान्य नाही, असा दावा सरोदे यांनी केला आहे.

**महाराष्ट्रात दुहेरी लाट**

लोकसभा निवडणुकीच्या वेळी देशभरात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधात लाट होती. त्याचवेळी महाराष्ट्रात मात्र दोन लाटा



होत्या. नरेंद्र मोदी विरोधी एक लाट आणि देवेंद्र फडणवीस विरोधी दुसरी लाट महाराष्ट्रातील मतदारांमध्ये होती, असेही सरोदे म्हणाले.

**तर सर्वोच्च न्यायालयाला पत्र लिहायचे**

शिवसेना आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसचा प्रश्न पक्षांतर बंदी कायद्यात बसत नसल्यामुळे आपण शेड्युल ६ अंतर्गत तो हाताळू शकत नसल्याचा नार्वेकर यांचा दावा आहे. हा प्रश्न जर तुम्ही हाताळू शकत नाही तर सर्वोच्च न्यायालयाला पत्र लिहून हस्तक्षेप करण्यास का सांगितले नाही, हा सवाल एक नागरिक म्हणून नार्वेकर यांना विचारणे आवश्यक आहे, असे मतही सरोदे यांनी व्यक्त केले.

अवैध सरकार आमच्या बोकांडी

राहुल नार्वेकर, देवेंद्र फडणवीस, अमित शहा, नरेंद्र मोदी हे सगळे संविधानाचे दोषी आहेत. त्यांनी बेकायदेशीर सरकार आमच्या बोकांडी बसवले आहे. हा संविधानाचा द्रोह आहे. ते संविधानाचे गुन्हेगार आहेत. त्यांची संविधानावर निष्ठा नाही. त्यामुळेच त्यांना संविधान बदलायचे आहे, असे आरोपही सरोदे यांनी केले.

# आंबेगांव तालुक्यातील वळती येथील वळती विकास सोसायटीच्या अध्यक्षपदी निलेश भोर यांची बिनविरोध निवड

**भोर ':** वळती (ता . आंबेगांव ) येथील विविध विकास कार्यकारी सोसायटीच्या अध्यक्षपदी निलेश किसन भोर तर उपाध्यक्षपदी बाळशिराम दत्तु भोर यांची एकमताने बिनविरोध निवड करण्यात आली .

वळती येथील विविध विकास कार्यकारी सोसायटीच्या अध्यक्ष व उपाध्यक्ष पदाची बुधवारी (दि .२६ ) सकाळी ११ वाजता मंचर येथील सहाय्यक निबंधक कार्यालय येथे बिनविरोध निवड करण्यात झाली . वळती विकास कार्यकारी सोसायटीच्या सन २०२४ - २५ साठी बिनविरोध निवड करण्यात आली .



अध्यक्षपदी निलेश किसन भोर तर उपाध्यक्षपदी बाळशिराम दत्तु भोर यांची

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस ( शरद पवार गट ) पक्षाचे पुणे जिल्हा ग्रामिणचे कार्याध्यक्ष देवदत्त निकम , तालुका अध्यक्ष धोंडीभाऊ भोर , खरेदी विक्री संघाचे संचालक बाळासाहेब बोऱ्हाडे यांच्या हस्ते नवनिर्वाचित अध्यक्ष निलेश किसन भोर व उपाध्यक्ष बाळशिराम दत्तु भोर यांचा सत्कार करण्यात आला . तसेच विकास सोसायटीचे मावळते अध्यक्ष अशोक नानाभाऊ लोंढे व भाऊसाहेब भिका भोर यांचा यावेळी सन्मान करण्यात आला . यावेळी धोंडीभाऊ भोर , बाळासाहेब बोऱ्हाडे , उपसरपंच तेजस भोर , शामराव लोंढे , बाळासाहेब शिंदे , चंद्रकांत भोर , बाबाजी भोर , हनुमंत बेनके , बाळासाहेब भोर , अशोक लोखंडे , संतोष लोखंडे , ज्ञानेश्वर भोर तसेच सोसायटीचे संचालक व ग्रामस्थ उपस्थित होते .

निवडणुक निर्णय अधिकारी व्हि .के वाघमारे व सोसायटीचे सचिव सोमेश्वर भागवत यांनी निवडणुकीचे कामकाज पाहिले .

# विठ्ठल ढोबळे यांना नालंदा पुरस्कार जाहीर



**वळती :** पारगाव (ता.आंबेगाव)चे माजी उपसरपंच विठ्ठल सिताराम ढोबळे यांना राज्यस्तरीय नालंदा ऑर्गनायझेशन गौरव पुणे यांच्यावतीने गौरविण्यात येणार आहे.पुरस्कार सन २०२४ चा आदर्श उपसरपंच म्हणून सन्मानित करण्यात येणार असल्याची माहिती नालंदा ऑर्गनायझेशन पुरस्कार समितीचे अध्यक्ष शरद गंभीरे आणि सचिव श्रीकांत जायभाय यांनी दिली.

ढोबळे यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन,परीसरातील जनजागृती, होतकरू व गरजू विद्यार्थी,खेळाडूना आर्थिक मदत,पुलवामा हल्ल्यात हुतात्मा झालेल्या जवानांच्या वारसांना आर्थिक मदत,स्वतःच्या वाढदिवसानिमित्त १५८ रक्तदानाचे शिबिराचे नियोजन केले होते तसेच विविध उपक्रमाचे उपक्रम राबविल्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला होता.नालंदा ऑर्गनायझेशन या संस्थेच्या वतीने उल्लेखनीय कार्याबद्दल आदर्श उपसरपंच पुरस्काराने गौरविण्यात येणार असल्याची माहिती समितीचे अध्यक्ष शरद गंभिरे आणि श्रीकांत जायभाय यांनी दिली.ढोबळे यांना हा

# कोल्हापुरात आज रिक्षा, टॅक्सीच्या बंदला चांगला प्रतिसाद




**कोल्हापूर :** गतमहिन्यापासून कोल्हापूर जिल्हा रिक्षा आणि टॅक्सी वाहनधारक समितीच्या वतीनं रिक्षा पासिंग दंड पन्नास रुपये आकारला जातोय. हा दंड रद्द करावा, यासाठी आतापर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा काढण्यात आला. तसंच प्रादेशिक परिवहन कार्यालय इथं खर्डा भाकरी आंदोलन करण्यात आलं होतं. मात्र अद्याप शासनानं यावर कोणतीच भूमिका न घेतल्यानं शहरात रिक्षा बंदची हाक देण्यात आली होती

यासाठी आज सकाळी साडे अकरा वाजता सीबीएस स्टॅन्ड परिसरात सर्वांनी एकत्र येत शासनाच्या आदेशाची होळी करून निषेध व्यक्त करण्यात आला. यावेळी जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

कोल्हापूर शहरात एकूण २७० रिक्षा थांबे आहेत. या आंदोलनामुळं रिक्षा थांब्यावर शुकशुकाट होता. या थांब्यावर पोलिसांचा बंदोबस्त होता. येत्या अधिवेशनात हा निर्णय रद्द करावा अन्यथा, हा लढा सुरूच ठेवू, असा इशारा संघटनेच्या वतीनं विजय देवणे यांनी दिला.

यावेळी सतीशचंद्र कांबळे, मनसे वाहतूक संघटनेचे राजू जाधव, रिक्षा संघटनेचे अध्यक्ष राजेंद्र जाधव, चंद्रकांत भोसले, महेश मस्के, मोहन बागडी, सादिक मुलांनी, सचिन पवार, सुरज बनसोडे, युवराज हळदीकर, आसिफ सय्यद, दिलदार मुजावर यांच्यासह रिक्षालक मालक उपस्थित होते.

## अश्लील व्हिडिओ व्हायरल प्रकरणी एकावर गुन्हा

**कोल्हापूर :** रिल्स स्टार युगुलाच्या मोबाइलमधील अश्लील व्हिडिओ कॉपी करून ते सोशल मीडियात व्हायरल केल्याप्रकरणी उमेश सुरेश भास्कर (वय ३२, रा. कुडित्रे, ता. करवीर) याच्यावर शाहूपुरी पोलिसांनी गुन्हा दाखल केला. याबाबत पीडित तरुणीने शाहूपुरी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली.

कसबा बावडा येथील रिल्स स्टार तरुण आणि उपनगरातील एका तरुणीचे प्रेम संबंध होते. तरुणाच्या मोबाइलमध्ये दोघांचे काही अश्लील व्हिडिओ होते. तरुणाने तो मोबाइल फेब्रुवारी २०२४ मध्ये उमेश भास्कर याला विकला. त्यावेळी उमेश याने मोबाइलमधील डेटा ट्रान्सफर करताना काही व्हिडिओ कॉपी करून घेतले. त्यातील काही अश्लील व्हिडिओ सोशल मीडियात व्हायरल केले.

हा प्रकार लक्षात येताच रिल्स स्टार युगुलाचे धाबे दणाणले. शहर उपअधीक्षक अजित टिके यांनी व्हायरल व्हिडिओबद्दल संबंधित तरुणाला बोलवून घेऊन चौकशी केली.

# दूध दरवाढ करून भेसळ थांबवा : आंदोलनाचा इशारा; तहसीलदारांना निवेदन

**तासगांव :** जिल्ह्यातील काही नामांकित दूध संस्थांकडून दुधाचे दर पाडून शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात लूट सुरू असून दुधात मोठ्या प्रमाणात भेसळ सुरू आहे. यावर तात्काळ कारवाई करा अन्यथा तीव्र आंदोलनचा इशारा तासगाव तालुका दूध संघर्ष समितीने दिला आहे. यासंबंधी प्रदीप माने पाटील यांच्या नेतृत्वाखाली तहसीलदार रवींद्र रांजणे यांना निवेदन देण्यात आले. यावेळी, बोलताना प्रदीप माने म्हणाले कि, ग्रामीण भागात दुग्धव्यवसाय हा शेतकऱ्यांचा प्रमुख व्यवसाय आहे. परंतू उत्पादन खर्च पाहता त्या तुलनेत दुधाचे दर खुपच कमी असून उत्पादन खर्चही भागत नाही. काही खासगी दुधसंघानी दुधाचे दर गतवर्षीपेक्षा कमी करुन दूध उत्पादकाचे कंबरडे मोडून, जगणे मुश्किल करुन सोडले आहे. या जगण्याच्या साधनावरतीच या खासगी दुधसंघानी डल्ला मारला आहे. शासनाने ठरवून दिलेल्या दरपत्रकाच्या आदेशाचे पालन न करता, ते आदेश मनमानी पद्धतीने पायदळी तुडविला



आहे. गेले वर्षभर शेतकऱ्यांच्या घरावर दरोडा घालण्याचे पाप या खासगी दुध संघानी केले आहे. त्यांचेवर कायदेशीर चौकशी करुन गुन्हे दाखल करावेत.

तसेच दुध व दुग्धजन्य पदार्थामध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणात घातक रसायनांची खुलेआम भेसळ केली जाते. यामध्ये खासगी दुध संघ व अन्न व औषध प्रशासनाच्या संगनमताने ही भेसळ चालू आहे व ग्राहकाच्या जिवीताशी खेळण्याचे महापाप या पांढऱ्या दुधातील काळ्या बोक्यांनी केले आहे. म्हणूनच शेतकऱ्याच्या निर्भेळ दुग्ध उत्पादनाला त्याच्या घामाचे योग्य दाम मिळत नाही. म्हणूनच आम्ही दूध उत्पादक संघर्ष समितीच्यावतीने आमच्या मागण्या पुढीलप्रमाणे दूध दरवाढ झालीच पाहिजे. गाईच्या दुधाला ३.५ फॅट व ८.५ एसएनएफ ला रु. ४० व म्हैशीच्या दुधाला ६.० फॅट व ९.० एसएनएफ ला रु. ६० दर मिळालाच पाहिजे. दुधाची वजनमापे गुणनियंत्रक विभागाने प्रत्येक डेअरीवर दरमहा तपासणी पथके सुरु करावीत. ११ मार्च २०२४ पासून बंद झालेले अनुदान विनाअटी शर्ती सुरु करावे. उत्तरप्रदेश राज्याच्या धर्तीवर भाकड जनावरांना प्रतीमाह रु. १५०० अनुदान द्यावे. पशुखाद्याच्या गुणवत्तेवर व दरावर शासनाने नियंत्रण ठेवावे व दुधाळ जनावरांचा मोफत विमा शासनाने काढावा. दुधातील भेसळ रोखण्यासाठी प्रभावी अमंलबजावणी करावी. दुध संघातून बाहेर महामार्गावर येणाऱ्या दुधाचे टँकर व दुधजन्य पदार्थ याचे नमुने तपासूनच विक्रीसाठी पाठवावे. अन्न व औषध प्रशासनाने दूध भेसळ रोखण्यासाठी किती कार्यवाही केल्या त्याचा अहवाल प्रसिध्द करावा. वरील मागण्या मान्य कराव्यात. मागण्या मान्य न झाल्यास दि. १ जुलै २०२४ पासून दुध उत्पादक संघर्ष समितीच्या वतीने तीव्र आंदोलनचा इशारा दिला आहे.

# दोन गटातील मारामारी प्रकरणी आठ जणांवर गुन्हा

## राजवाडा चौपाटीवरील व्हीडीओ व्हायरल प्रकरण

**सातारा :** येथील राजवाडा चौपाटीवर दोन गटांत मारामारी करणाऱ्या तरुणांचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर शाहूपुरी पोलिसांनी आठ जणांना ताब्यात घेऊन त्यांच्यावर गुन्हा दाखल केला.

प्रतापसिंह उद्यानामध्ये रिमोट कंट्रोलच्या गाडीमध्ये बसण्याच्या कारणावरून बेकायदेशीर जमाव जमवून तरुणांच्या दोन गटांत रविवारी मारामारी झाली होती.

प्रमोद सोमनाथ रासकर (रा. सदर बाझार, सातारा), अमित शिवाजी जाधव (रा. मंगळवार पेठ, सातारा), विवेक रवींद्र गंगावणे (रा. माजगावकर माळ झोपडपट्टी), रोशन शिवाजी करंडे (रा. सदर बझार, सातारा), गौरव प्रल्हाद आवळे (रा. माजगावकर माळ झोपडपट्टी), अजय विजय गोळे, अनिल हणमंत शिंदे, शशिकांत ऊर्फ सागर रमेश गलांडे (सर्व, रा. जकातवाडी, ता. सातारा) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी हवालदार स्वप्नील कुमार पवार यांनी फिर्याद दिली आहे.

या आठ जणांनी बेकायदा जमाव जमवून राजवाड्यावर मारामारी केली. त्यामुळे शांततेचा भंग झाला. या घटनेचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर शाहूपुरी पोलिसांनी संशयितांना शोधून पोलिस आणले. त्यानंतर त्यांच्यावर कारवाई केली. महिला हवालदार यादव या अधिक तपास करीत आहेत.



**देखणे सौंदर्य येवतेश्वर डोंगर परिसराचे ....**

**सातारा जिल्ह्यात यंदा मान्सून पावसाचे जोरदार आणि वेळेत आगमन झाले त्यानंतर पण हा परिसर हिरवाईने नटू लागला आहे यवतेश्वर हून पिसाणीकडे जाणाऱ्या कास रस्त्यावर उजव्या बाजूला दरीच्या सानिध्यातून दिसणारे हे आराम खुर्ची सारखे हिरवेगार डोंगर पर्यटकांना अक्षरशः वेड लावत आहेत. निसर्ग पर्यटनाची ही दृश्य आपल्या कॅमेऱ्यात टिपली आहेत.**

**- (छाया : अतुल देशपांडे सातारा )**

## वेलनेस स्पामध्ये वेश्याव्यवसाय छापा; एकावर कारवाई

**कोल्हापूर :** शाहूपुरी तिसऱ्या गल्लीत वेलनेस स्पामध्ये सुरू असलेल्या वेश्या अड्ड्यावर शाहूपुरी पोलिसांनी छापा टाकून कारवाई केली. स्पा चालक नागेश रमेश बेळन्नावर (वय ३२, मूळ रा. हिप्पगिरी विजापूर, ता. चडचण, जि. विजापूर) आणि जागा मालक दत्तात्रय गणपती शिंदे (रा. शाहूपुरी, ३ री गल्ली) या दोघांवर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. बेळन्नावर याला अटक केली तसेच दोन पीडित महिलांची सुटका करण्यात आली.

नागरी वस्तीत स्पाच्या नावाखाली वेश्या अड्डा सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार सोमवारी रात्री छापा टाकून झडती घेतली असता, दोन पीडित महिला आढळल्या. त्यांच्याकडे अधिक चौकशी केली असता, स्पा चालक बेळन्नावर याने पीडित महिलांचा गैरफायदाघेऊन वेश्या अड्डा चालवल्याची माहिती समोर आली.

पोलिसांनी पीडित महिलांची सुटका करून स्पा चालक बेळन्नावर याला अटक केली. स्पासाठी जागा देणारा मालक दत्तात्रय शिंदे याच्यावरही गुन्हा दाखल केला. बेळन्नावर याच्यावर यापूर्वीही अवैध मानवी व्यापार प्रतिबंधक कायद्यानुसार कारवाई झाली आहे.

# संतांनी जातीभेद विसरून सर्वांना सामावून घेण्याची दिली शिकवण : आ. अश्विनी जगताप

**पिंपरी :** महाराष्ट्राला धारकरी आणि वारकरी अशी मोठी परंपरा आहे. एकीकडे छत्रपती शिवाजी महाराजांचा मावळा तर दुसरीकडे संतांच्या छत्रछायेखाली एकवटलेला वारकरी संप्रदाय आपल्याला पाहायला मिळतो. संत ज्ञानेश्वर माऊलींनी कुठल्याही जातीभेदाला थारा न देता सर्वांना सामावून घेत पंढरीची वारी सुरू केली. आज शेकडो वर्षे झाली ही वारी आणि वारकरी संप्रदाय जातीभेद विसरून देवाप्रती समर्पण भावनेने विठ्ठलाच्या चरणी लीन झालेले आहेत. ज्ञानोबा तुकोबांची ही शिकवण महाराष्ट्रातील सर्व जनतेच्या मनामनात रुजलेली आहे. अशा या महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायातील दिंडी प्रमुख आणि भजनी मंडळांचा यथोचित सन्मान करून नवा आदर्श भाऊसाहेब भोईर आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या पिंपरी चिंचवड शाखेने घालून दिलेला आहे; ही कौतुकास्पद बाब आहे, असे मत आमदार अश्विनी जगताप यांनी व्यक्त केले.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या पिंपरी चिंचवड शाखेच्या वतीने जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या पालखी प्रस्थान सोहळ्याच्या निमित्ताने शहरात



दाखल झालेल्या दिंड्यांमधील दिंडी प्रमुख तसेच भजनी मंडळाच्या प्रमुखांचा

सन्मान गुरुवारी (२७ जून) ग. दि. माडगूळकर सभागृह निगडी येथे करण्यात आला. यावेळी पिंपरी चिंचवड मराठी नाट्य परिषद शाखेचे अध्यक्ष भाऊसाहेब भोईर, सुनील महाजन, माजी नगरसेवक नाना काटे, राजेंद्र जगताप, शत्रुघ्न काटे, आप्पा बागल, सुरेश भोईर, कुणाल वाव्हळ, अनंत कोऱ्हाळे, राहुल भोईर, नाट्य परिषदेचे जयराज काळे, किरण येवलेकर, रुपाली पाथरे, हभप नीलम शिंदे, आसाराम कसबे, राजेंद्र बंग, संतोष रासने आदी उपस्थित होते. पुरोगामी महाराष्ट्रात संतांचे विचार खोलवर रुजलेले आहेत महाराष्ट्राला वारकरी संप्रदायाची गौरवशाली परंपरा आहे परंतु आज महाराष्ट्रातील एकंदर वातावरण पाहता वारकरी संप्रदायाने राजकारण्यांवर अंकुश ठेवला पाहिजे वेळप्रसंगी त्यांना खडे बोल सुनावले पाहिजेत, असे भाऊसाहेब भोईर म्हणाले.

यावेळी दिंडी प्रमुख हभप राजेंद्र महाराज शेलार, हभप सुदाम महाराज नखाते, हभप सिताराम महाराज मातेरे, हभप अनंत महाराज मोरे, हभप दळवी महाराज, हभप कैलास महाराज साठे, हभप सुचिता गटणे, हभप विजया साठे, हभप बाळासाहेब शितोळे, भजनी मंडळाच्या नंदा ढोरे, उर्मिला चव्हाण, शैलजा कुलकर्णी, लता कांचन, राजाभाऊ कड, जयवंत चांदेरे, श्याम महाराज देशमुख, काळूराम इंगवले, ज्ञानेश्वर मुरकुटे, कान्होपात्रा पवार, हनुमान भजनी मंडळ तसेच भगवत गीतेतील श्लोक मुखोदगत केलेल्या श्रावणी नाईक आणि बाळासाहेब मरळ यांचा विशेष सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन विनायक रणसुभे तर किरण येवलेकर यांनी आभार मानले.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# केंद्रीय मंत्र्यांचा राजीनामा मागा किंवा तुम्ही राजीनामा द्या

## नीट घोटाळा प्रकरणी जितेंद्र आव्हाड यांचे अजित पवार यांना आव्हान



**मुंबई :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नीट परीक्षार्थींची भेट घेण्याच्या भानगडीत न पडता केंद्रीय मंत्र्यांचा राजीनामा मागावा किंवा स्वतः राजीनामा द्यावा, अशा शब्दात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते यांनी पवार यांना आव्हान दिले आहे.

नीट परीक्षेतील घोटाळ्याच्या पार्श्वभूमीवर अजित पवार यांनी आपण पुणे आणि मुंबईतील नीट परीक्षार्थींची भेट घेणार असल्याचे जाहीर केले आहे. या पार्श्वभूमीवर आव्हाड यांनी केंद्र सरकारवर आगपाखड केली. मागील ७० -७५ वर्षात झाला नसेल एवढा शिक्षण क्षेत्राचा बट्ट्याबोळ सध्याच्या काळात झाला आहे, अशी टीका जितेंद्र आव्हाड यांनी केली. एमबीबीएससारख्या अभ्यासक्रमासाठी गुणवत्ता तपासणार नसाल, केवळ वशिल्याने डॉक्टर बनवणार असाल तर तुम्ही जनतेच्या जीवाशी खेळत आहात याची जाणीव ठेवा. अशिक्षित माणसाला पाच दहा कोटी रुपये घेऊन तुम्ही डॉक्टर बनवणार. तोच पुढे शल्य विशारद, स्त्रीरोगतज्ञ, बालरोग तज्ञ होणार. पोटाच्या ऐवजी छातीची शस्त्रक्रिया करणार, अशा शब्दात आव्हाड यांनी केंद्र सरकारवर टीका केली.

नीट परीक्षेतील घोटाळ्यामुळे विद्यार्थ्यांचे वर्ष वाया गेले. त्यांच्या वर्षाला काही किंमत आहे की नाही? त्यांच्या कष्टाला काही किंमत आहे की नाही? नीटसारखी महत्त्वाची परीक्षा पार पाडण्याची जबाबदारी खाजगी संस्थेकडे सोपविली जाते. हा काय तुमच्या घरातला विषय आहे का, असा सवाल आव्हाड यांनी केला. या प्रकाराबद्दल सरकारने प्रायश्चित्त घ्यायला हवे, असेही ते म्हणाले.

नीट परीक्षार्थींची भेट कसली घेता? केंद्रात तुमचे सरकार आहे. तुमच्या मित्र पक्षाचा मंत्री आहे. नीट घोटाळ्याला जबाबदार असलेल्या मंत्र्याचा राजीनामा मागा. ते करता येत नसेल तर तुम्ही राजीनामा द्या, अशा शब्दात आव्हाड यांनी अजित पवार यांनाही सुनावले.

# सगे सोयरेच्या वादात 'वंचित'चीही उडी

**छत्रपती संभाजीनगर :** सगेसोयरेच्या व्याख्येनुसार जात प्रमाणपत्र देण्याचा आग्रह ही आरक्षण कायद्यात केलेली ढवळाढवळ असल्याचा आक्षेप घेऊन मराठा आरक्षणाच्या वादात वंचित बहुजन आघाडीने ही उडी घेतली आहे. यासंदर्भात क्रांती चौकात लावण्यात आलेला एक फलक लक्षवेधी ठरला असून अरबी फाउंडेशन च्या वतीने लावण्यात आलेल्या या फलकावर शुभेच्छुक म्हणून वंचित बहुजन आघाडीचा उल्लेख करण्यात आला आहे.

जात प्रमाणपत्र देताना रक्ताच्या नातेवाईकांचे जात प्रमाणपत्र हा अत्यंत महत्त्वाचा पुरावा मानला जातो. मात्र, सगे सोयऱ्यांना अर्थात रक्ताचे नातेवाईक नसलेल्यांनाही जात प्रमाणपत्र देण्याचा राज्य सरकारचा अध्यादेश म्हणजे आरक्षणाचा कायदा आणि त्याच्या नियमावलीत करण्यात आलेली ढवळाढवळ आहे, असा आक्षेप या फलकावर नमूद करण्यात आला आहे.

मराठा समाजाला इतर मागास प्रवर्गातून आरक्षण देण्यात यावे. कुणबी नोंद सापडलेल्या व्यक्तींच्या सगे सोयऱ्यांनाही कुणबी प्रमाणपत्र देण्यात यावे, अशा मागण्यांसाठी अंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे पाटील सातत्याने आंदोलने करीत आहेत तर याच गावाला लागून असलेल्या वडीगोद्री या गावात प्रा लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे हे ओबीसी नेते आरक्षण बचावासाठी उपोषण करीत आहेत.

या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर विशेषतः राज्याच्या ग्रामीण भागात मराठा आणि इतर मागासवर्गीय यांच्यात वितृष्ठ निर्माण झाल्याचे चित्र आहे. त्यातच आता वंचित बहुजन आघाडीने या वादात उडी घेतली तर त्याला नवा आयाम प्राप्त होणार आहे. त्यातून राज्यातील सामाजिक वातावरण अधिक कलुषित होण्याची शक्यता आहे.

वास्तविक लोकसभा निवडणुकीपूर्वी वंचितचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी मनोज जिरांगे यांच्या आंदोलनाबद्दल सहानुभूती व्यक्त केली होती. जरांगे यांच्या आंदोलनाची दखल घेऊन त्यातून नवे राजकीय समीकरण साकारण्याबाबत चाचपणीही आंबेडकर यांनी केली होती. या पार्श्वभूमीवर आता मात्र वंचितने सगे सोयऱ्याच्या मुद्द्यावरून या वादात उडी घेतली असेल तर त्याचे परिणाम चिंता वाढवणारे ठरणार आहेत.

# 'सरकारला सहकार्य करण्याची विरोधकांची भूमिका, मात्र...'

**नवी दिल्ली :** सरकारला सहकार्य करण्याचीच विरोधकांची भूमिका राहील. मात्र, संख्याबळाच्या आधारे आमचा आवाज दडपता येणार नाही. सभागृहात आम्हाला बोलू दिले पाहिजे. आमची बाजू मांडण्याची पुरेशा प्रमाणात संधी मिळाली पाहिजे, अशी अपेक्षा काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी व्यक्त केली.

लोकसभेच्या अध्यक्षपदी ओम बिर्ला यांची पुन्हा निवड करण्यात आली. लोकसभा अध्यक्ष पदासाठी सन १९७६ नंतर प्रथमच निवडणूक पार पडली. यावेळी निवडणुकीत भारतीय जनता पक्ष आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या वतीने ओम बिर्ला तर काँग्रेस आणि इंडिया आघाडीच्या वतीने काँग्रेसचे खासदार के सुरेश रिंगणात होते. आवाजी मतदानाने ओम बिर्ला यांची निवड करण्यात आली. निवड झाल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राहुल गांधी यांनी बिर्ला यांचा अभिनंदन करून त्यांना अध्यक्ष स्थानावर बसविले. निवडणूक प्रचारादरम्यान एकमेकांवर आगपाखड करणाऱ्या मोदी आणि गांधी या दोन्ही नेत्यांनी यावेळी हस्तांदोलन केले. संपूर्ण सभागृहाने त्याचे स्वागत केले. त्यानंतर सभागृहात बोलताना राहुल गांधी यांनी यापुढे विरोधक सभागृहात जोरकस भूमिका घेतील हे सूचित केले.

या अठराव्या लोकसभेत विरोधी पक्ष मजबूत आहे. सरकारकडे बहुमत आणि संख्याबळ असले तरीही इंडिया आघाडी हा सर्वसामान्य भारतीय जनतेचा आवाज आहे. हा आवाज सरकारला दडपून टाकता येणार नाही, असा इशाराही राहुल गांधी यांनी दिला. नवनिर्वाचित लोकसभा अध्यक्ष विरोधकांना सभागृहात आपली बाजू मांडण्याची संधी देतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

आम्हाला सभागृहात बोलू दिले पाहिजे. विरोधकांचा आवाज झडपणे हे लोकशाही विरोधी आहे. विरोधकांना गप्प बसवून संसद चालविता येणार नाही. सरकारला सहकार्य करण्याची आमची भूमिका आहे. मात्र, सभागृहात विरोधकांना त्यांचे मत मांडण्याची संधी मिळणे आवश्यक आहे, असेही गांधी म्हणाले.

या लोकसभा निवडणुकीत विरोधकांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. या कामगिरीचा उल्लेख करून राहुल गांधी यांनी यापुढील काळात संख्याबळाच्या आधारे विरोधकांचा आवाज दडपता येणार नाही, याची जाणीव गांधी यांनी सरकारला करून दिली. विविध मुद्द्यांवर विरोधक आक्रमक भूमिका घेतील,, असेही त्यांनी सूचित केले.

# जागावाटपाबाबतच्या चर्चा प्रसारमाध्यमांसमोर नको: शंभूराज देसाई

**मुंबई :** महायुतीच्या जागावाटपाची चर्चा प्रसारमाध्यमांसमोर करण्याची गरज नाही. सर्व घटकपक्षाचे प्रमुख नेते त्याबद्दल योग्य तो निर्णय घेतील, अशा शब्दात मंत्री शंभूराज देसाई यांनी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते अमोल मिटकरी यांना सुनावले आहे.


आगामी विधानसभा निवडणुकीत ५०, ५५ जागांवर आमचे समाधान होईल असे नाही. पण प्रत्येकाला १००, १०० जागा हव्या असतील तर सर्वांना स्वतंत्रपणेच लढावे लागेल, असे विधान मिटकरी यांनी केले आहे. पूर्वपरवानगीशिवाय राजकीय विधाने करू नयेत, असे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी बजावले असूनही मिटकरी यांनी हे विधान पक्षाच्या परवानगीने केले आहे काय, असा सवाल उपस्थित होत आहे..

विधानसभा निवडणुका तीन-चार महिन्यांवर येऊन ठेपले असताना महाविकास आघाडीने जागावाटपाचे प्राथमिक सूत्र निश्चित केले आहे.

महायुतीत मात्र भारतीय जनता पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट आणि शिवसेना एकनाथ शिंदे गट यांच्यात कोण किती जागा लढविणार याबद्दल संभ्रम आहे. लोकसभा निवडणुकीत कमी जागा मिळाल्याने विधानसभा निवडणुकीत अधिक जागा मिळाव्या, अशी शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोघांचीही अपेक्षा आहे. केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांचा रिपब्लिकन पक्ष आणि महादेव जानकर यांचा राष्ट्रीय समाज पक्ष हे देखील काही जागांचा वाटा मागणार आहेत. महाराष्ट्र नवनिर्माण सेना महायुतीत सहभागी होऊन आपल्या वाट्याच्या जागांची मागणी करणार का, हा देखील प्रश्न आहे. या पार्श्वभूमीवर मिटकरी यांच्यासारख्या नेत्यांच्या विधानाने संभ्रमात भरच पडत आहे.

# भाजपाचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांची तब्येत बिघडली

## IIMS रुग्णालयात केले दाखल



भाजपाचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांची तब्येत बिघडल्याची माहिती समोर येत आहे. लालकृष्ण अडवाणी यांना उपचारांसाठी दिल्लीतील एम्स रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. आताच्या घडीला लालकृष्ण अडवाणी यांच्यावर एम्स रुग्णालयातील डॉक्टर उपचार करत आहेत. लालकृष्ण अडवाणी यांचे वय ९६ आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, वरिष्ठ डॉक्टरांच्या निरीक्षणाखाली लालकृष्ण अडवाणी यांच्यावर उपचार सुरू आहे. बुधवारी सायंकाळी उशिरा त्यांना अस्वस्थ वाटू लागले. त्यानंतर त्यांना एम्स रुग्णालयात दाखल करण्यात आले.

लोकसभा निवडणुकीत एनडीएला बहुमत मिळाले. त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लालकृष्ण अडवाणी यांची भेट घेतली होती आणि तिसरा कार्यकाळ सुरू करण्यापूर्वी त्यांचे शुभाशिर्वाद घेतले होते. तत्पूर्वी लालकृष्ण अडवाणी यांना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते देशाचा सर्वोच्च भारतरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला होता.

# महाराष्ट्रात गटबाजी कराल तर खैर नाही

## काँग्रेस पक्षश्रेष्ठींनी दिला खणखणीत इशारा



**नवी दिल्ली :** काँग्रेसमध्येकोणत्याही प्रकारची गटबाजी नको, असा आदेश त्या पक्षाचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनीमहाराष्ट्रातीलकाँग्रेस नेत्यांना दिला आहे. तर काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी सांगितले की,महाराष्ट्रातीलकाँग्रेस नेत्यांपैकी जे लोक पक्षाचा आदेश पाळणार नाहीत त्यांच्यावर कारवाई करा. विधानसभा निवडणुकांच्या पूर्वतयारीसाठी दिल्लीमध्ये बैठक पार पडली. त्यामध्ये काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, राहुल गांधी तसेच महाराष्ट्रातील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते उपस्थित होते. या बैठकीत खरगे यांनी सांगितले की, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसमधील गटबाजी संपली पाहिजे. त्यावर महाराष्ट्रातील या पक्षाच्या एका नेत्याने सांगितले की, आमच्यात कोणतीही गटबाजी नाही. त्यावर खरगे म्हणाले की, मुंबई अध्यक्ष वर्षा गायकवाड यांना पदावरून हटवा आणि हटवू नका या मागणीसाठी दोन शिष्टमंडळे माझ्याकडे आली होती. 'राज्यातील नेत्यांना नीट समजावून सांगा'

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी महाराष्ट्राचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांना सांगितले की, यंदाच्या विधानसभा निवडणुकांमध्ये कोणीही गटबाजी करू नये हे महाराष्ट्रातील नेत्यांना नीट समजावून सांगा. हा आदेश त्यांनी पाळला नाही तर त्यांच्यावर कारवाई करा.मग दावा कसा करता?

एका गटाने नाना पटोले यांना महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या पक्षाध्यक्षपदावरून दूर करा, अशी मागणी केली. अशा मागण्या होऊनही महाराष्ट्रात काँग्रेसमध्ये गटबाजी नाही, असा दावा तुम्ही कसा काय करता? असा

जाब खरगे यांनी नेत्यांना विचारला.



### एमएचटी-सीईटीच्या प्रश्नपत्रिका आणि उत्तरतालिका पुन्हा एकदा पाहण्याची संधी

**मुंबई :** एमएचटी-सीईटीच्या प्रश्नपत्रिका आणि उत्तरतालिका (आन्सर की) २७ ते ३० जून दरम्यान विद्यार्थी-पालकांना पाहण्याकरिता पुन्हा एकदा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. ही परीक्षा विविध सत्रात ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आली.

परीक्षेनंतर विद्यार्थ्यांना आक्षेप नोंदविण्याकरिता त्यांच्या लॉगीनमध्ये तीन दिवसांकरिता उत्तरतालिका उपलब्ध करून देण्यात आली. त्यानंतर ती काढून टाकण्यात आली. निकाल १६ जूनला जाहीर केल्यानंतर काही विद्यार्थ्यांनी उत्तरतालिका पुन्हा एकदा उपलब्ध करून देण्याची मागणी सीईटी-सेलकडे केली होती. त्यानुसार पीसीए गटासाठी २७ आणि २८ जून आणि पीसीबी गटासाठी २९ आणि ३० जूनला उत्तरतालिका व प्रश्नपत्रिका उपलब्ध करून दिली जाणार आहे.

# महिला सक्षमीकरणासाठी महत्वाची 'लाडली बहन योजना' राज्यात सुरू करा

**गोंदिया :** मध्यप्रदेश सरकारने 'लाडली बहन योजना' योजना सुरू केली. ही योजना राज्यातही सुरू करावी, अशी मागणी आ. विनोद अग्रवाल यांनी केली. या संदर्भात राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री फडणवीस, अजित पवार यांची भेट घेवून निवेदन दिले.

नजिकच्या मध्यप्रदेश राज्यात 'लाडली बहन योजना'ची अंमलबजावणी सुरू आहे. योजना महिला सक्षमीकरणासाठी महत्वाची ठरली आहे. योजनेतंर्गत महिला सक्षमीकरण, गरोदर महिलांना पौष्टिक आहार या स्वरूपात आर्थिक सहाय्य दिले जाते. गर्भवती महिलांना पौष्टिक आहाराची नितांत गरज असते जेणेकरून मुलांमध्ये कुपोषणाचे प्रमाण नष्ट व्हावे व आई आणि बाळ दोघेही निरोगी राहण्यास मदत होते. त्यामुळे राज्यातही अशाप्रकारे योजना सुरू करण्यात यावी, यासाठी आ. विनोद अग्रवाल यांनी तत्परता दाखवून कैबिनेट बैठक पूर्वी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेतली व मागणीचे निवेदन दिले. यावर मुख्यमंत्री

# निरोप द्यायला सभागृहात यायला हवे ना, फेसबुक लाइव्ह करुन...; शिंदेंचे ठाकरेंना प्रत्युत्तर

विरोधकांनी जंग जंग पछाडले. पण नरेंद्र मोदी पंतप्रधान झाले. हा मोदींचाच विजय आहे. इंडिया आघाडीचा पराभव आहे, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. विधानसभेचे अधिवेशन सुरू होत आहे. या विधानसभा अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला महाविकास आघाडी आणिमहायुतीमध्येआरोप-प्रत्यारोप झाल्याचे पाहायला मिळाले. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला राज्य सरकारने आयोजित केलेल्या चहापान कार्यक्रमावर विरोधकांनी बहिष्कार टाकल्याचे पाहायला मिळाले. अनेक मुद्दे उपस्थित करत सरकारवर टीका केली. या टीकेला सरकारकडूनही प्रत्युत्तर देण्यात आले.-विधान परिषदेच्या शिक्षक, पदवीधर मतदारसंघाची निवडणूक झाली. या निवडणुकीत मतदान केल्यानंतर उद्धव ठाकरे यांनी मीडियाशी बोलतानामहायुतीसरकारवर टीका केली होती. उद्यापासून राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन होत आहे. महायुतीच्या खोके सरकारचे हे निरोपाचे अधिवेशन आहे. उद्या माध्यमांशी बोलताना राजकीय विषयाबाबत भूमिका मांडेन, असे उद्धव ठाकरे यांनी सांगितले. याबाबत महायुतीच्या वतीने घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत मुख्यमंत्रीएकनाथ शिंदेयांना प्रश्न विचारण्यात आला. यावर मुख्यमंत्री शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर खोचक शब्दांत पलटवार केला.निरोप देण्यासाठी सभागृहात तर यायला पाहिजे ना...स्वाभिमान कुठे गहाण टाकला? लोकांच्या मनातले सरकार आम्ही बनवले. आज त्यांच्यापेक्षा आम्हाला लोकांनी जास्त मते दिली. काही लोक म्हणाले की, हे निरोपाचे अधिवेशन आहे. आता निरोप देण्यासाठी सभागृहात तर यायला पाहिजे ना? की फेसबुक लाईव्हवरूनच निरोप देणार? निरोप द्यायचा की घ्यायचा हे जनता ठरवत असते, असेएकनाथ शिंदेयांनी सांगितले. ठाकरे गटाबाबत सांगायचे झाले तर आम्ही १३ जागा लढलो. त्यातील ७ जागा आम्ही जिंकलो. एकूण १९ टक्के मतांपैकी १४.५० टक्के मते धनुष्यबाणाला मिळाली. मग तुमच्याकडे किती टक्के मते राहिली. आता आलेली ही सूज आहे. ही सूज उतरेल. तुम्ही दिशाभूल करून मत मिळवलेली आहेत, अशी टीका शिंदे यांनी केली.शेवटी नरेंद्र मोदीच पंतप्रधान झालेविरोधी पक्ष गोंधळलेला आहे. तुमच्यासमोर आले असतील आणि म्हणाले असतील की, महायुतीला लोकसभेत यश मिळाले नाही, त्यामुळे सत्ताधारी पोकळ आश्वासनाची घोषणा करतील. नरेंद्र मोदी यांच्या पराभवासाठी विरोधकांनी जंग जंग पछाडले. संविधान बदलणार, असे खोटे नरेटिव्ह सेट केले. आरक्षण जाणार असे म्हटले. यामध्ये त्यांना क्षणिक आनंद मिळाला असेल. एवढे सर्व करून काय झाले? शेवटी नरेंद्र मोदीच पंतप्रधान झाले. त्यामुळे मोदी जिंकले आणि इंडिया आघाडीचा पराभव झाला. तरी सुद्धा आमचे काही लोक दुसऱ्यांच्या वरातीत घोड नाचवणारे आहेत, असा खोचक टोलाही मुख्यमंत्री शिंदे यांनी लगावला.दरम्यान, विरोधकांनी एवढे करूनही काँग्रेसला फक्त ९९ जागा मिळाल्या. म्हणजे तीन टर्ममध्ये ४०, ५० आता ९९. मग आता तुम्हाला २४० पर्यंत पोहण्यासाठी २५ वर्ष लागतील. आम्ही शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही. विरोधकांनी शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसायचे काम केले. आम्ही खोट्या अफवांचा पाऊस पाडणारे लोक नाहीत. शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय आम्ही घेऊ. त्यानंतर विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकेल. मुंबईला विरोधकांनी खड्यांत टाकण्याचे काम केले, असे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

# आधी पक्ष बळकट करू, नंतर महायुती!

## महाराष्ट्रासाठी भाजपकडून तयारी सुरू

**नवी दिल्ली :** महाराष्ट्रात ऑक्टोबरमध्ये होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाच्या महत्त्वाच्या बैठकांची एक फेरी पुढील आठवड्यात मुंबईत होणार आहे. महाराष्ट्र निवडणूक प्रभारी भूपेंद्र यादव आणि सहप्रभारी अश्विनी वैष्णव नेत्यांच्या मॅरेथॉन बैठका घेणार आहेत. महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीसाठी भाजपने पूर्ण ताकद लावण्याचा निर्णय घेतला आहे. पुढील आठवड्यात भाजपचे निवडणूक प्रभारी भूपेंद्र यादव आणि अश्विनी वैष्णव हेही मुंबईतील भाजप नेत्यांशी निवडणुकीच्या तयारीबाबत चर्चा करणार आहेत.

निवडणूक सहप्रभारी अश्विनी वैष्णव यांनी सांगितले की, अगोदर पक्ष बळकट करण्यावर भर दिला जाईल. जे नाराज आहेत त्यांना समजवून कामाला लावू, झालेल्या चुका सुधारू आणि मग महायुती मजबूत करू. भाजपकडून कमकुवत क्षेत्रांवर लक्ष केंद्रित केले जात असल्याचे सूत्रांनी माहिती देताना सांगितले.

**नाराजांना भेटणार**

'भाजप'चे जुने नेते आणि नाराज नेते यांच्या घरी जाऊन भाजपचे ज्येष्ठ नेते त्यांना भेटतील आणि त्यांची नाराजी दूर करतील. २०१९ मध्ये भाजपने २३ जागा जिंकल्या होत्या. तर २०२४च्या लोकसभा निवडणुकीत भाजपला ९ जागाच जिंकता आल्या आहेत.

# राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे जिल्हाधिकाऱ्यांनी टोचले कान

## ठेकेदारावर मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करावा अन्यथा महामार्ग रोखण्याचा इशारा

**सातारा :** पुणे-बंगलोर राष्ट्रीय महामार्गाचे शेंद्रे ते कागल या दरम्यान रस्ता रुंदीकरणाचे काम सुरू आहे. या कामांमध्ये ठेकेदाराचा गजब कारभार पाहायला मिळत आहे. त्याच्या गलथान कारभारामुळे अनेकांचे जीव जात आहेत. भरतगाव येथे रस्त्याच्यामधील दुभाजक फोडून केलेल्या उपक्रमाच्या विरोधात भरतगाव ग्रामस्थ आक्रमक झालेले असून त्यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे संबंधित ठेकेदारावर गुन्हा दाखल करावा अन्यथा रास्ता रोको करू, असा इशारा दिला आहे. तसेच सर्व्हिस रस्ता सुरू करण्यात यावा, अशी मागणी केली आहे.

यावरून जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी लगेच फोन लावून संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांची कान उघडणी केली. तर पोलीस अधीक्षक समीर शेख यांनीही भरतगाव ग्रामस्थांना कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे.

# 'इनामदार मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल'तर्फे वारकऱ्यांसाठी वैद्यकीय तपासणी शिबिर

**पुणे :** डॉ.पी. ए. इनामदार यांच्या 'इनामदार मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल'(वानवडी)च्या वतीने आषाढी वारीतील वारकऱ्यांसाठी मोफत वैद्यकीय तपासणी आणि उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. दिनांक १ जुलै २०२४ रोजी हे शिबिर ७८, गुरुवार पेठ, नवयुग मित्र मंडळ, शीतळादेवी चौकाजवळ सकाळी ८ ते सायंकाळी ६ पर्यंत होणार आहे.या शिबिरात हॉस्पिटलचे तज्ज्ञ डॉक्टर्स, परिचारीका, सहाय्यक वर्ग वारकऱ्यांच्या सेवेत सहभागी होणार आहे. या उपक्रमाचे हे तेरावे वर्ष आहे.

# महाज्योतीच्या नीट जेईई मोफत ऑनलाइन प्रशिक्षणासाठी नोंदणी अर्जाला सुरुवात !

महात्मा जोतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था महाज्योती नागपूर या शासनाच्या स्वायत्त संस्थेव्दारा ओबीसी विजेएनटी व एसबीसी विद्यार्थ्यांसाठी विविध मोफत स्पर्धात्मक परीक्षांसाठी मोफत प्रशिक्षण दिल्या जात असते. संबंधित मोफत प्रशिक्षणासोबत विद्यार्थ्यांना स्टायपेंड सुद्धा देत असते.



या सोबतच ग्रामीण व सामान्य विद्यार्थी विद्यार्थिनींसाठी महाज्योतीने जेईई नीट एमएच सीईटी यासाठी मोफत ऑनलाइन प्रशिक्षण मागील दोन वर्षापासून सुरु केलेला आहे. त्याचा लाभ सुमारे वीस हजार विद्यार्थ्यांनी घेतला असून, अनेकांना या माध्यमातून जेईई नीट परीक्षेत चांगले गुण मिळून शासकीय इंजिनिअर मेडिकल महाविद्यालयात सुद्धा प्रवेश मिळालेले आहेत.

असे असतांना या वर्षी मात्र विद्यार्थ्यांचे ११ विला प्रवेश सुरू होवूनही अजूनही महाज्योतीची प्रवेश नोंदणी साठी जाहिरात आलेली नव्हती. त्यामुळे विद्यार्थी व पालक यांचेमध्ये संभ्रम निर्माण झालेला होता.

म्हणून महाज्योतीचे माजी संचालक व राष्ट्रवादीचे प्रदेश उपाध्यक्ष प्रा. दिवाकर गमे यांनी महाज्योतीचे व्यवस्थापकीय संचालक मा. राजेश खवले यांची भेट घेवून, या ऑनलाइन प्रशिक्षणासाठी तत्काळ जाहिरात काढावी अशी विनंती करून लेखी निवेदन दिले. त्यामधे या पूर्वीच्या महाज्योतीच्या ठरावाप्रमाणे शहरी व ग्रामीण विद्यार्थी अशी विभागणी करुन, ग्रामीण विद्यार्थ्यांना ६०% गुण तर शहरी विद्यार्थ्यांना ७०% गुण अशी वर्ग १० पास नोंदणी अर्जासाठी अट ठेवावी. तसेच ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी ५०% प्रशिक्षणाच्या जागा ठेवाव्यात अशी मागणी केली. ती मागणी महाज्योतीचे व्यवस्थापकीय संचालक यांनी मान्य करून जाहिरात काढलेली आहे.

२०२६ मधे ही जेईई नीट एम एच सीईटी ची परीक्षा देवू इच्छिणाऱ्या , व वर्ग १० नुकतीच मार्च २०२४ ची परीक्षा पास करून ग्रामीण साठी ६०% तर शहरी साठी ७०% गुण मिळविणारे विद्यार्थी विद्यार्थीनी या साठी पात्र राहतील. यासाठी विद्यार्थ्यांना आधार कार्ड,रहिवासी दाखला,जातीचे प्रमाणपत्र,वैध नॉनक्रिमिलेअर प्रमाणपत्र, १० वीची गुणपत्रिका,११ वी विज्ञान शाखेत प्रवेश घेतल्याचा दाखला,दिव्यांग किंवा अनाथ सवलत अपाप्त करायची असल्याचा त्याचा वैध दाखला,ही प्रमाणपत्रे अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.ग्रामीण व शहरी विद्यार्थ्यांची ओळख ही त्यांच्या आधार कार्ड वरुन केली जाईल असे महाज्योतीचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रशांत वावगे यांनी जाहीरातीमधे नमुद केलेल आहे. नमुद केलेले आहे.

या ऑनलाइन प्रशिक्षणासाठी तज्ञ प्राध्यापक यांचे मार्गदर्शन मिळणार असून, निवड झालेल्या विद्यार्थ्यांना ब्रँडेड कंपनीचा आठ इंची टॅब मोफत मिळणार आहे.त्याशिवाय १८ महिनेपर्यंत विद्यार्थ्यांना मोफत दररोजचा ६ जीबी इंटरनेट डेटा मिळणार आहे.विद्यार्थ्यांना देण्यात येणारे टॅब विद्यार्थ्यांकडेच कायमस्वरूपी राहणार आहे. तरी ओबीसी विजेएनटी एसबीसी विद्यार्थ्यांनी , ज्यांनी वर्ग ११ वी सायन्स मधे प्रवेश घेतला आहे त्यांनी महाज्योतीच्या संकेतस्थळावर जावून ऑनलाइन पध्दतीने नोंदणी करून अर्ज भरावा असे आवाहन महाज्योतीचे माजी संचालक व राष्ट्रवादीचे प्रदेश उपाध्यक्ष प्रा. दिवाकर गमे यांनी विद्यार्थ्यांना केलेले आहे.

# संजय गांधी निराधार योजनेच्या २७८ लाभार्थींना मंजुरी पत्रकांचे वाटप



**वडगाव मावळ :** संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल, दिव्यांग,विधवा तसेच निराधार असलेल्या २७८ लाभार्थींना कुलस्वामिनी महिला मंचच्या अध्यक्षा सारिका शेळके यांच्या हस्ते मंजुरी पत्रकांचे वाटप विश्रामगृह वडगाव मावळ येथे करण्यात आले.

आमदार सुनिल शेळके यांच्या मार्गदर्शनातून सर्वसामान्य गरजू व्यक्तींना अशा शासकीय योजनांचा लाभ मिळाला याचा आनंद आहे.अशा भावना सारिका शेळके यांनी व्यक्त केल्या.

दुर्बल घटकांना,दिव्यांग व वृद्ध व्यक्तींना आर्थिक आधार मिळावा या हेतूने सरकार अशा योजना राबविते, मात्र या योजनेच्या लाभासाठी योग्य मार्गदर्शन मिळत नसल्यामुळे कागदपत्रांची पूर्तता करताना सर्वसामान्य नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागतो.

नागरिकांची हीच अडचण लक्षात घेऊन आमदार सुनिल शेळके यांच्या जनसंपर्क कार्यालयामार्फत कागदपत्रे जमा करणे,त्याची पूर्तता करणे आणि विविध स्तरावर पाठपुरावा करणे असे सहकार्य केले जाते.त्यामुळे गरजु लाभार्थ्यांपर्यंत योजनेचा लाभ पोहोचविण्यास मदत होत असल्याचे मत लाभार्थ्यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमास नायब तहसीलदार जयश्री मांडवे, संजय गांधी निराधार योजना समितीचे माजी अध्यक्ष नारायण ठाकर, माजी सदस्य अजिंक्य टिळे, राष्ट्रवादी काँग्रेस दिव्यांग सेल अध्यक्ष सुभाष शेडगे, रुपेश सोनुने, नबिलाल आत्तार, गणेश तळपे व इतर मान्यवर उपस्थित होते.

# पन्हाळ्यात जागतिक बँकेचे पथक

## भूस्खलन प्रवण क्षेत्रासह विविध ठिकाणी भेट भूस्खलनाच्या घटनांची तीव्रता कमी करण्यासाठीच्या उपाय योजनेवर चर्चा

**राजदंड न्युज नेटवर्क**

**पन्हाळा :** पन्हाळा व परिसरात वारंवार घडणाऱ्या भूस्खलन व दरडी कोसळण्याच्या घटना, त्यापासून होणाऱ्या अनेक प्रकारच्या नुकसानीची तीव्रता कमी करण्यासाठी घ्यावी लागणारी दक्षता व उपाय योजने बाबत प्रकल्प अहवाल तयार करण्यात येणार आहे. हा प्रस्ताव राज्य शासनामार्फत जागतिक बँकेकडे सादर केला जाणार आहे. यासाठी जिल्हा अपत्ती व्यावास्थापन,सार्वजनिक बांधकाम विभाग,वनविभाग यांचे सहकार्याने जिल्हाधिकारी कार्यालय कोल्हापूर अहवाल तयार करणार आहे त्यासाठीची स्थळ पाहणी करण्यासाठी जागतिक बँकेच्या पथकांने पन्हाळगडावर भूस्खलन प्रवण क्षेत्रासह विविध ठिकाणी भेट दिली.



**जागतिक बँकेच्या शिष्टमंडळाला माहिती देताना आर्किटेकट असोसिएशन अध्यक्ष अजय कोराणे व उपस्थित मान्यवर.**

पन्हाळा व परिसरात मोठ्या प्रमाणात घडणाऱ्या भूस्खलन व दरडी कोसळण्याच्या घटनांची तीव्रता कमी करण्याकरिता राबविले जाणारे प्रकल्प व उपायासाठी जागतिक बँकेकडून अर्थसाहाय्य करण्यात येणार आहे. त्यादृष्टीने पाहणी करण्यासाठी चारजणांचे पथक आले होते. जागतिक बँकेच्या पथकात बँक प्रमुख जोलांता वोटसन,पर्यावरण तज्ञ नेहा व्यास,दक्षिण आशिया अर्बन रेझीलीयंस सल्लागार जर्क गेल,जिल्हाअपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ.प्रसाद संकपाळ यांचा समावेश होता.पथकाने मोठ्या प्रमाणात झालेल्या भूस्खलन व दरडी कोसळलेल्या ठिकाणांची पाहणी केली.

पन्हाळा तहसिलदार माधवी शिंदे जाधव यांनी शिष्टमंडळाचे स्वागत केले. यावेळी सन २०१९ ते २०२१ या काळात झालेल्या भूस्खलन व दरडी कोसळलेल्या ठिकाणांची व झालेल्या नुकसानीची व त्यावेळी केलेल्या उपाय योजनांची माहिती दिली. शिष्टमंडळाने प्रत्येक्ष भूस्खलन झालेल्या ठिकाणी भेट देऊन सद्यस्थिती जाणून घेतली. त्यानंतर भूस्खलनाच्या घटनांची तीव्रता कमी करण्यासाठी विविध उपाययोजनांवर चर्चा झाली. येथील भूस्खलन व तटबंदी शेजारील दरडी कोसळण्याच्या कारणांवर चर्चा केली.त्या अनेक कारण पैकी ऐतिहासिक काळात गडावरील पाण्याचा निचरा करणाऱ्या मार्गात अडथळे निर्माण झाल्याने,तसेच तटबंदीवर वाढलेली झाडे झुडपे हि दोन प्रमुख कारणे आहेत. त्यामुळे शिष्टमंडळाने पावसाच्या पाण्याचा योग्य प्रकारे निचरा करणे.तसेच पर्यावरणाची व ऐतिहासिक वस्तूची हानी न करता उपाय योजना करण्याच्या सूचना केल्या.

यावेळी कनिष्ठ भु वैज्ञानिक कोल्हापूर राहुल खंदारे,मुख्याधिकारी चेतनकुमार माळी, सार्वजनिक बांधकामचे उप अभियंता सचिन कुंभार,शाखा अभियंता अमोल कोळी,आर्किटेकट असोसिएशन अध्यक्ष अजय कोराणे,माजी उप नगराध्यक्ष चैतन्य भोसले, रविंद्र धडेल,रामानंद गोसावी व नागरिक उपस्थित होते.

# कल्लाप्पाण्णा आवाडे जनता बँकेचा व्यवसाय ५ हजार कोटीवर नेण्याचे उद्दिष्ट : स्वप्निल आवाडे

**कोल्हापूर :** कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता बहुराज्य बँकेचा मिश्र व्यवसाय ४२५० कोटीचा आहे. तो मार्च २०२५ अखेर ५ हजार कोटी रुपये करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे, असे बँकेचे अध्यक्ष स्वप्निल आवाडे यांनी गुरुवारी सांगितले.




या बँकेची ६२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा झाली. यावेळी अध्यक्षीय भाषणात ते म्हणाले, बँकेच्या आजवरच्या कारकिर्दीत विक्रमी असा ५४ कोटी रुपयांचा नफा मिळवलेला आहे. विविध समाजाच्या महामंडळाच्या योजनांचा सर्वाधिक लाभ याच बँकेने दिला आहे. आगामी काळामध्ये नेट बँकिंग सुरू करण्याचा नियोजन केले आहे.

बँकेच्या वतीने घरगुती वीज वापरासाठी स्वयंप्रकाश सौर प्रकल्प योजना राबवण्याची घोषणा त्यांनी केली. ते म्हणाले, याकरिता ग्राहकांनी ५ टक्के व्याज भरायचे आहे. ७५ हजार रुपयांचे अनुदान मिळणार आहे. मासिक विजेच्या बिलाइतकीच रक्कम हप्त्यापोटी भरली तरी ७ वर्षांमध्ये कर्ज फिटते.

या बँकेच्या प्रयत्नामुळे सर्व प्रकारचे आधुनिक बँक माग इचलकरंजी मध्ये येऊ शकले, असा उल्लेख करून बँकेचे मार्गदर्शक आमदार प्रकाश आवाडे यांनी बँकेने व्यावसायिक धोरण असताना ग्राहकाभिमुख कर्ज प्रकरणे हाताळण्याकडे लक्ष देण्याची गरज व्यक्त केली. बँकेचे संस्थापक अध्यक्ष माजी खासदार कल्लाप्पाण्णा आवाडे यांच्यासह माजी अध्यक्ष, संचालक उपस्थित होते. मुख्य कार्यकारी अधिकारी संजय शिरगावे यांनी नोटीस वाचन केले. उपाध्यक्ष संजय कुमार अनिगोळ यांनी आभार मानले.

# अन्न व औषध प्रशासनामार्फत

## ४५ लाखावर पानमसाला व सुगंधित तंबाखूचा साठा जप्त

**सांगली :** अन्न व औषध प्रशासन विभागाच्या विशेष भरारी पथकाने आज सांगली शहरामध्ये कारवाई करुन ४५ लाख २५ हजार ९६० रूपये किंमतीचा प्रतिबंधित अन्न पदार्थ पानमसाला व सुगंधित तंबाखूचा साठा जप्त केला असल्याची माहिती अन्न व औषध प्रशासन विभागाचे सहाय्यक आयुक्त (अन्न) नि. सु. मसारे यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे दिली आहे.

याबाबत दिलेल्या प्रसिध्दी पत्रकात म्हटले आहे, विशेष भरारी पथकास मिळालेल्या गुप्त माहितीच्या अनुषंगाने अन्न सुरक्षा अधिकारी श्री. स्वामी व श्री. पवार यांनी जुने बुधगाव रोड येथील अलताफ रमजान मुलाणी यांच्या शेडची तपासणी केली असता या ठिकाणी महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेले पानमसाला व सुगंधित तंबाखू यांचा साठा आढळून आला. तसेच शेडच्या समोर उभ्या असलेल्या दोन वाहनांची तपासणी केली असता त्यामध्ये देखील पानमसाला व सुगंधित तंबाखू यांचा साठा आढळून आला. अन्न व औषध प्रशासन, सांगलीच्या पथकाने या ठिकाणी कारवाई करून ४५ लाख २५ हजार ९६० रूपये किंमतीचा प्रतिबंधित अन्न पदार्थाचा साठा व २ वाहने (किंमत ५ लाख ५० हजार रूपये) जप्त करुन ताब्यात घेवून शेड सीलबंद करण्यात आले. या प्रकरणी पुढील तपासाकरीता शहर पोलीस स्टेशन, सांगली येथे प्रथम खबर अहवाल दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई अन्न व औषध प्रशासन विभागाचे मंत्री यांच्या नियंत्रणाखालील विशेष भरारी पथकाने अरविंद कांडेलकर, श्री. समुद्रे व सहायक आयुक्त (अन्न) श्री. मसारे यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा अधिकारी श्री. स्वामी व श्री. पवार यांनी केली आहे.

जिल्ह्यातील सर्व व्यवसायिकांनी प्रतिबंधित अन्न पदार्थाचा साठा, विक्री करु नये असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच प्रतिबंधित अन्न पदार्थाचा साठा, विक्री करताना आढळल्यास त्यांचविरुध्द अन्न सुरक्षा व मानके कायद्याअंतर्गत कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी, असेही प्रसिध्दी पत्रकात नमूद करण्यात आले आहे.

# सकल हिंदू समाजाकडून शुक्रवारी पाटण बंदची हाक

**पाटण :** सकल हिंदू समाज पाटण तालुका यांच्याकडून पाटण बंदची हाक देण्यात आलेली असून, केरा पुल या ठिकाणी सकाळी ११ वाजता सकल हिंदू समाजाकडून रास्ता रोको करण्यात येणार आहे अशा आशयाचे निवेदन पाटण पोलीस स्टेशन यांना देण्यात.

पुणे शहर हे महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी म्हणून ओळखली जाते,हे सांस्कृतिक राजधानी असलेले शहर देखील काही असंस्कृत घटनांना आणि घटकांना अपवाद नाही. देशाची एकता आणि एकात्मता यांना जोडणारे काही राष्ट्रपुरुष आणि राष्ट्रीय प्रतीके यांचा महाराष्ट्रात सतत चालू असणारा अवमान पुण्यातील हडपसर येथील घटनेने अधोरेखित केला आहे. सामाजिक बंधुतेला काळीमा फासणारी '' छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान करणारी घटना हिंदू समाज सहन करू शकत नाही.हिंदूंची अस्मिता असणारी राष्ट्रपुरुष छत्रपती शिवाजी महाराज यांचा जो अपमान झाला आहे. त्याबद्दल संपूर्ण महाराष्ट्रात संतापाची लाट आहे.कट रचून,पूर्वतयारीने फक्त हिंदू प्रतीकांच्या आणि राष्ट्रपुरुषांची व प्रतिकांची अपमान पुण्यात संपूर्ण महाराष्ट्रात चालू आहे. राज्यात राष्ट्रपुरुष व राष्ट्र प्रतीके यांचा अपमान घडलेल्या घटना पुन्हा घडू नयेत म्हणून राज्य सरकारने राष्ट्रपुरुष व राष्ट्र प्रतीके यांचा अपमान करून सामाजिक शांतता व सुरक्षा धोक्यात आणणाऱ्या गुन्हेगारांना दहा वर्षे सक्त मजुरीची शिक्षा देणारा कायदा पारित करावा. पुण्यात घडलेल्या घटनेला केंद्रस्थानी ठेवून यासारख्या घटना ज्या राज्यभरात घडत आहेत त्यांच्या निषेर्धात दिनांक २८ मार्च २०२४ रोजी रास्ता रोको आंदोलन संपूर्ण महाराष्ट्रभर करण्यात येणार आहे. भारतीय संविधानाने राष्ट्रीय पुरुष व प्रतीके यांचा सन्मान करणे हा मूलभूत कर्तव्याचा भाग म्हणून नमूद केले आहे. याच कर्तव्याचा भाग म्हणून आणि राष्ट्रीय पुरुष आणि प्रतीके यांच्या सन्मानार्थ रास्ता रोको करण्यात येणार आहे. प्रत्येक गावातील,वाडी वस्तीवरून व शहरातून मोठ्या संख्येने रास्ता रोको करण्यासाठी पाटण या ठिकाणी यावे अशी आव्हान सकल हिंदू समाजाकडून करण्यात आलेले आहे.

# अथर्वसिंग भदोरिया भारतीय संघ निवड चाचणीसाठी पात्र

**पुणे :** २२ व्या कुमार सुरेंद्र सिंग नेमबाजी स्पर्धेत ध्रुव ग्लोबल स्कूलचा विद्यार्थी अथर्वसिंग भदोरिया याने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करून भारतीय संघ निवड चाचणीसाठी पात्र ठरला आहे. भारतीय संघाची निवड चाचणी जुलै महिन्यात दिल्लीत होणार आहे. अथर्वसिंग भदोरियाने भारतीय संघात पात्रतेसाठी ५५५/६०० गुण मिळवले आहेत.



२२ वी कुमार सुरेंद्र सिंग नेमबाजी चॅम्पियनशिप स्पर्धा नुकतीच मध्य प्रदेश येथील भोपाळ मध्ये संपन्न झाली. एअर पिस्तूल पुरुष गटात देशभरातून २ हजारांहून अधिक स्पर्धकांनी सहभाग घेतला. यामध्ये नेमबाज अथर्वसिंगने दमदार सुरुवात करत ५५५ गुण मिळवले. या भारतीय संघाच्या निवड चाचणीत ध्रुव ग्लोबल स्कूलचे दोन विद्यार्थी सहभागी होणार आहेत. या यशाबद्दल ध्रुव ग्लोबल स्कूलचे संचालक यशवर्धन मालपाणी व मुख्याध्यापिका संगीता राऊतजी यांनी त्यांचे अभिनंदन केले. अश्विनी गुंजाळ, सोनाली परेराव आणि संध्या फरताडे या शिक्षिका त्यांना खेळाचे प्रशिक्षण देत आहेत.

## पूर, दरडींचा २९६ गावांना धोका

**सातारा :** भारतीय हवामान खात्याने यंदा सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडणार असल्याचा अंदाज वर्तविला आहे. सातारा जिल्ह्यात पावळ्यात पूर तसेच दरडी कोसळ्याचा धोका असतो. पूरप्रवण गावे नदीकाठची/ संभाव्य पूरप्रवण गावे १७२, तर संभाव्य दरडप्रवण गावे १२४ आहेत. या ठिकाणच्या आपत्ती रोखण्यासाठी तसेच आपत्ती उद्भवल्यास उपाययोजना करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने तयारी केली आहे. संभाव्य आपत्तीजन्य परिस्थितीच्या कालावधीत एडीआरएफची १ तुकडी १ जुलैला दाखल होणार असून, ती कराड, पाटणमध्ये पाठविली जाणार आहेत. दरडप्रवण व परप्रवण भागात प्रशिक्षण दिले आहे.

# विधानसभा निवडणूक दिलीप वळसे पाटील यांच्यासाठी आव्हानात्मक



**पुणे :** नुकत्याच लोकसभेच्या निवडणुका पार पडल्यानंतर राज्यातील महाविकास आघाडीचा आत्मविश्वास दुणावला आहे. त्याच पार्श्वभूमीवर आंबेगाव तालुक्यात देखील महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ.अमोल कोल्हे यांना मताधिक्य मिळाल्यामुळे आगामी काळात होणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीत राज्याचे सहकार मंत्री तथा आमदार दिलीप वळसे पाटील यांच्या दृष्टीने आंबेगाव विधानसभेची निवडणूक जड जाण्याची चिन्हे आतापासूनच दिसू लागली आहेत.

दरम्यान आंबेगाव तालुक्यात महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ( शरद पवार गट ) नेतृत्व एकेकाळचे दिलीप वळसे पाटील यांचे कट्टर समर्थक देवदत्त निकम करत असून त्यांनी तालुक्यात आपली राजकीय पकड घट्ट केली आहे.काही दिवसांपूर्वी लोकसभेच्या निवडणुका पार पडल्या त्यामध्ये शिरूर लोकसभा मतदारसंघात महायुतीचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ( अजित पवार गट ) आंबेगाव तालुक्यातीलच असलेले माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांना स्वतःच्या तालुक्यात देखील मताधिक्य मिळाले नाही शरद पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेतृत्व करत असलेल्या देवदत्त निकम यांनी कोल्हे यांच्या समवेत तालुक्यात प्रचार सभांच्या माध्यमातून मताधिक्य मिळवून देण्यात यश मिळवले . त्यातच शिरूर तालुक्यातील ३९ गावांनी महायुतीचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांना फटकारले तर महाविकास आघाडीचे उमेदवार असलेल्या डॉ.अमोल कोल्हे यांना १५००० हून अधिकचे मताधिक्य दिले .

लोकसभा निवडणुकीत शिरूर तालुक्यातील आंबेगाव विधानसभेला जोडलेल्या ३९ गावांचा वळसे पाटलांचा करिष्मा यावेळी चालला नाही , त्याला कारणही तसेच आहे . कारण ३९ गावांच्या पाण्याचा प्रश्न गेल्या काही वर्षापासून प्रलंबित असून कलमोडी धरणाचे पाणी ३९ गावांना मिळावे अशी येथील मतदारांची अपेक्षा आहे . मात्र अद्याप पर्यंत या मतदारांची अपेक्षा सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील पुर्ण करू न शकल्याने वळसे पाटलांचा करिष्मा लोकसभेच्या निवडणुकीत चालला नाही असे बोलले जात आहे .

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शरदचंद्र पवार गटाचे नेते शरद पवार यांची वळसे पाटील यांनी अचानक सोडलेली साथ ही बाब देखील मतदारांना रुचलेली नसल्याचे झालेल्या लोकसभा निवडणुकीत दिसून आले .त्यामुळे आगामी काळात होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत मतदार राजा वळसे पाटलांना स्वीकारतील का ? हा खरा प्रश्न आहे . तर दुसरीकडे महाविकास आघाडीतील शरदचंद्र पवार गटाचे राष्ट्रवादीचे नेतृत्व करत असलेले देवदत्त निकम यांनी मात्र तालुक्यात जोरदार राजकीय मुसंडी मारल्याचे दिसून येते .जनतेच्या सुखदुःखात सातत्याने देवदत्त निकम पाहायला मिळत असल्याचे सध्याचे चित्र आहे तर या उलट वळसे पाटील कुटुंबातील व्यक्ती जनसंपर्कात कमी पडल्याचे चित्र पाहायला मिळते .

विधानसभेच्या निवडणुका तीन महिन्यांवर येऊन ठेपलेल्या आहे . आंबेगाव तालुक्यात महाविकास आघाडीच्या वतीने शरदचंद्र पवार गटाचे देवदत्त निकम यांची उमेदवारी जवळजवळ निश्चित झाली आहे .त्या अनुषंगाने निकम यांनी तालुक्यातील गावागावात जनसंपर्क देखील वाढविला असल्याचे दिसून येते मात्र महाविकास आघाडीतील तालुक्यातील उबाठा गटाचे शिवसेनेचे जिल्हाप्रमुख सुरेश भोर आणि जिल्हा संघटक म्हणून काम करत असलेले प्रा. राजाराम बाणखेले हे देखील वळसे पाटलांच्या विरोधात निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक असून त्यांनी देखील आपल्याला उमेदवारी मिळावी म्हणून जोरदार प्रयत्न चालवले आहेत. आंबेगाव तालुक्यात शिवसेनेचे सुमारे साठ हजार मतदार असून या मतदारांच्या आणि महाविकास आघाडीतील इतर पक्षांच्या जोरावर आपण निवडणूक जिंकू शकतो असा दावा भोर यांनी केला आहे . त्यामुळे महाविकास आघाडीची आंबेगाव तालुक्यातील उमेदवारी आपल्यालाच मिळावी यासाठी उबाठा गटाच्या सुरेश भोर यांनी देखील राजकीय फिल्डिंग लावली आहे .तालुक्यात महायुतीचे नेते सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी गेल्या ३०-३५ वर्षात विकास कामे केली असली तरी जनतेच्या सुखदुःखात सहभागी असणारा नेता हवा असा सूर तालुक्यातील जनतेतून अळविला जात आहे .त्यामध्ये प्रामुख्याने शरदचंद्र पवार गटाचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ग्रामीणचे कार्याध्यक्ष देवदत्त निकम उजवे ठरले आहेत . सातत्याने जनसंपर्कात राहून जनतेच्या सुखदुःखात सहभागी होत असल्याने निकम यांची राजकीय बाजू सध्या तरी उजवी ठरत असल्याचे पाहायला मिळते .

एकूणच शिवसेना शिंदे गटातून काही महिन्यापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटात सामील झालेल्या माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांचे कार्यकर्ते आणि अजित पवार गट राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे वळसे पाटील यांचे कार्यकर्ते यांचे विधानसभा निवडणुकीत मनोमिलन होणार का ? हे येणारा काळच ठरवेल.

मात्र होणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीत वळसे पाटील यांच्या दृष्टीने आंबेगांव विधानसभेची निवडणूक कठीण जाण्याची चिन्हे दिसू लागली आहे.

**(आंबेगांव तालुका ग्रामिण वार्तापत्र)**